

## धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## नोव्हेनाचा पहिला दिवस – गुरूवार ३० जानेवारी २०२५

**पहिले वाचन ः इब्री १० ः१९–२५** **शुभवर्तमान ः मार्क ४ ः २१ – २५**

## विश्वासू लोकांच्या प्रार्थना

धर्मगुरू ः बंधू आणि भगिनी म्हणून ख्रिस्ताठायी आपण एकत्र जमलो आहोत. प्रभूने आपल्यावर केलेल्या अनेक उपकारांची आपण आठवण करू या. प्रार्थना करण्यास परमेश्वर आपल्याला स्फूर्ती देतो. आमच्या प्रार्थना स्वीकारण्यास आपण त्याला विनंती करू या.

प्रतिसाद ः **प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. आपले पोप फान्सिस, बिशप थॉमस, धर्मगरू व व्रतस्थ ह्यांना आपले पाळकीय कार्य ख्रिस्ताच्या नम्रतेच्या शिकवणूकीनुसार पार पाडण्यास पवित्र आत्म्याचे सामर्थ्य व चांगले आरोग्य लाभावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. आजच्या शुभवर्तमानात प्रभू आपल्याला सावध करीत आहेत की ज्या मापाने आपण देऊ त्याच मापाने आपल्याला परतफेड केली जाईल. चांगली कामे करून आपण प्रभूकडून उत्तम प्रतिफळ मिळण्यास पात्र ठरावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. आपल्या सर्व पालकांनी त्यांच्या मुलांवर योग्य ते संस्कार करून त्यांना भावी जीवनात आध्यात्मिक पाठबळाद्वारे चांगले ख्रिस्ती व आदर्श नागरिक बनण्यास मार्गदर्शन करावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. आपल्या धर्मग्रामात कार्य करीत असलेल्या धर्मगुरूंच्या पाळकीय कार्यावर प्रभूचा भरपूर आशीर्वाद असावा, त्यांना चांगले आरोग्य व सर्वांकडून सहकार्य व प्रार्थनेचे पाठबळ लाभावे तसेच आपल्याकडे कार्य करून गेलेल्या सर्व मृत धर्मगुरूंना स्वर्गीय सुख मिळावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. आपल्या धर्मग्रामातील सर्वांवर विशेषकरून जे आजारी आहेत अशावर परमेश्वराचा वरदहस्त असावा, जे परगावात व परदेशात आहेत, जे नोकरीच्या शोधात आहेत, जे दररोज प्रवास करीत आहेत अशा सर्वांवर परमेश्वराचा विशेष आशीर्वाद नेहमी राहावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडावेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक व कौटुंबिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

धर्मगुरू ः हे स्वर्गीय पित्या, संत गोन्सालोच्या मध्यस्थीने तुझ्या ख्रिस्तसभेच्या प्रार्थना ऐक. आमच्या श्रद्धेमधील उणिवा तुझ्या प्रेमाने भरून काढ व आमच्या मागण्या मान्य कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.



# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## नोव्हेनाचा दुसरा दिवस – शुक्रवार ३१ जानेवारी २०२५

**पहिले वाचन ः इब्री १०ः ३२–३९** **शुभवर्तमान ः मार्क ४ः२६–३४**

## विश्वासू लोकांच्या प्रार्थना

धर्मगुरू ः माझ्या बंधुभगिनींनो, आमच्या तारणाचे रहस्य साजरे करण्यासाठी ख्रिस्ताठायी आम्ही येथे एकत्र जमलो आहोत. जीवन आणि आशीर्वादाचा हा झरा अखिल जगाला खुला करण्यासाठी आपण आपल्या परमेश्वरपित्याकडे याचना करू या.

प्रतिसाद ः **प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. आपले पोप फ्रान्सिस, बिशप थॉमस, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना आपल्या समर्पित जिवनाद्वारे येशूची साक्ष जगाला देण्यासाठी पवित्र आत्म्याची कृपा मिळावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. आजच्या शुभवर्तमानात निरनिराळया दाखल्याद्वारे प्रभू स्वर्गराज्याची संकल्पना आपल्यापुढे ठेवत आहेत. प्रभूच्या शब्दावर मनन चिंतन करून स्वर्गराज्याविषयीच्या आपल्या ज्ञानात भर पडावी व ते मिळविण्यासाठी आपण नेहमी प्रयत्नशील असावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. मिशन हा आपल्या ख्रिस्ती जीवनाचा अविभाज्य घटक आहे. मिशनमध्ये काम करणा-या सर्वांवर प्रभूचा आशीर्वाद असावा तसेच बाप्तिस्मा घेतलेल्या प्रत्येक ख्रिस्ती माणसाला मिशन कार्याचे पाचारण स्वीकारण्यास प्रभूची कृपा मिळावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. आपल्या धर्मग्राम पाळकीय मंडळाचे सर्व सदस्य, सेवक नेते, चर्चवर व गावपरिवारात नेहमी सहकार्य करणारे श्रद्धावंत ह्यांना प्रभूने आशीर्वादित करावे व संत गोन्सालोच्या मध्यस्थीने त्यांना त्यांचे कार्य अधिक प्रभावीपणे करण्यास प्रेरणा लाभावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. आपल्या धर्मग्रामात जन्मास आलेल्या नवजात बालकांना ईश्वराच्या संरक्षणाचे कवच लाभावे, आई वडिलांकडून त्यांची ख्रिस्ती श्रद्धेत योग्य ती जडण घडण व्हावी तसेच बाळाची प्रतिक्षा करणा-या दाम्पत्यांस देवाचा आशीर्वाद लाभावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडावेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक व कौटुंबिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

धर्मगुरू ः हे सर्वसमर्थ पित्या, संत गोन्सालोच्या मध्यस्थिने तुझ्या लोकांच्या प्रार्थना ऐक. तुझ्या प्रेरणेमुळे श्रद्धेने आम्ही तुझ्याकडे प्रार्थना करतो त्यांचा तू स्वीकार कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.



## धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

### नोव्हेनाचा तिसरा दिवस – शनिवार ०१ फेब्रुवारी २०२५

सकाळी : **पहिले वाचन** : इब्री ११: १-२,८–१९ **शुभवर्तमान** : मार्क ४: ३५ – ४१

संध्याकाळी : **पहिले वाचन**: मलाखी ३:१–४ **दुसरे वाचन** : इब्री २:१४-१८

**शुभवर्तमान** : लूक २ : २२ – ४०

### विश्वासू लोकांच्या प्रार्थना

धर्मगुरू : बंधू आणि भगिनी म्हणून ख्रिस्ताठायी आपण एकत्र जमलो आहोत. प्रभूने आपल्यावर केलेल्या अनेक उपकारांची आपण आठवण करू या. प्रार्थना करण्यास परमेश्वर आपल्याला स्फूर्ती देतो. आमच्या प्रार्थना स्वीकारण्यास आपण त्याला विनंती करू या.

प्रतिसाद : **प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. ख्रिस्तसभेची सेवा करणारे आपले पोप फान्सिस, बिशप थॉमस, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना जीवनातील प्रत्येक परिस्थितीत श्रद्धेत टिकून राहण्यास ईश्वरी सहाय्य लाभावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. आजच्या शुभवर्तमानात वादळाला घाबरलेल्या शिष्यांच्या कमकुवत विश्वासाबद्दल प्रभू त्यांची कान उघडणी करतात. बाप्तिस्म्याद्वारे मिळालेला आपला विश्वास बायबल वाचन, कौटुंबिक व वैयक्तिक प्रार्थनेद्वारे दिवसेंदिवस वृद्धीगंत व्हावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. संत गोन्सालोने जपान देशात जाऊन प्रामाणिकपणे व्यापार केला आणि त्यात तो यशस्वी देखील झाला. आपल्या व्यवसायात, नोकरीत, शेती व घरकामात संत गोन्सालोचा आदर्श आपण नेहमी डोळयापुढे ठेवावा व आपले काम मनापासून व सचोटीने करावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. आपल्या धर्मग्रामातील जे युवक नोकरी व्यवसायाच्या शोधात आहेत, जे युवक चांगल्या जोडीदाराच्या शोधात आहेत तसेच जे युवक वाईट व्यसनांच्या आहारी गेले आहेत अशा सर्व युवकांवर परमेश्वराचा आशीर्वाद असावा व चर्च संलग्न संस्थेत त्यांचा सक्रीय सहभाग असावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. आपल्या धर्मग्रामातील इतरत्र कार्यरत असलेल्या सर्व धर्मगुरू, धर्मबंधू व धर्मभगिनींवर परमेश्वराचा भरपूर आशीर्वाद असावा व त्यांना चांगल्या आरोग्याची देणगी मिळावी तसेच जे देवाघरी गेले आहेत त्यांना स्वर्गीय सुख मिळावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडावेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक व कौटुंबिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

धर्मगुरू : हे स्वर्गीय पित्या, संत गोन्सालोच्या मध्यस्थीने तुझ्या ख्रिस्तसभेच्या प्रार्थना ऐक. आमच्या श्रद्धेमधील उणिवा तुझ्या प्रेमाने भरून काढ व आमच्या मागण्या मान्य कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.



## धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

### सामान्य काळातील चौथा रविवार - येशूचे देवालयात समर्पण - २ फेब्रुवारी २०२५

### नोव्हेनाचा चौथा दिवस

**पहिले वाचन** ः मलाखी ३ः१–४ **दुसरे वाचन** ः इब्री २ः१४-१८

**शुभवर्तमान** ः लूक २ ः २२ – ४०

### विश्वासू लोकांच्या प्रार्थना

धर्मगुरू ः माझ्या बंधुभगिनींनो, आमच्या तारणाचे रहस्य साजरे करण्यासाठी ख्रिस्ताठायी आम्ही येथे एकत्र जमलो आहोत. जीवन आणि आशीर्वादाचा हा झरा अखिल जगाला खुला करण्यासाठी आपण आपल्या परमेश्वरपित्याकडे याचना करू या.

प्रतिसाद ः **प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. आपले पोप फान्सिस, बिशप थॉमस, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना ख्रिस्तसभेची सेवा अधिक प्रभावीपणे करण्यास पवित्र आत्म्याचे सहाय्य व चांगल्या आरोग्याची देणगी लाभावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. आपल्या राजकीय नेत्यांनी त्यांना मिळालेल्या अधिकाराचा वापर सामान्य जनतेच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी करावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. पवित्र मरियेचे शुद्ध व निष्कलंक जीवन व येशूचे देवालयात समर्पण याद्वारे आमचे जीवन शुद्ध, निर्मळ व येशूला अभिप्रित असे असावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. शिमोन ह्या नीतिमान माणसाला मरणापूर्वी प्रभूच्या ख्रिस्ताला पाहण्याचे भाग्य मिळाले व त्याने देवाचा गौरव केला. शिमोनप्रमाणे आपल्याला देखील प्रभूचे तारण पाहण्याचे भाग्य मिळावे तसेच आपल्या तरूणांना प्रभूच्या मळयात काम करण्यासाठी पाचारण व्हावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. ख्रिस्ताचे हात बनून त्याचे अति पवित्र शरीर आजारी व वयोवृद्धांकडे घेऊन जाणारे आपले ख्रिस्तशरीर प्रसेवक ह्यांना प्रभूचा कृपा आशीर्वाद लाभावा, आपल्या चांगल्या आचारणाद्वारे इतरांना प्रभूकडे आणण्यास त्यांना प्रेरणा लाभावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडावेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक व कौटुंबिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

धर्मगुरू ः हे सर्वसमर्थ पित्या, संत गोन्सालोच्या मध्यस्थिने तुझ्या लोकांच्या प्रार्थना ऐक. तुझ्या प्रेरणेमुळे श्रद्धेने आम्ही तुझ्याकडे प्रार्थना करतो त्यांचा तू स्वीकार कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.



# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## नोव्हेनाचा पाचवा दिवस – सोमवार ०३ फेब्रुवारी २०२५

**पहिले वाचन ः इब्री ११ ः ३२–४०** **शुभवर्तमान ः मार्क ५ः १ – २०**

## विश्वासू लोकांच्या प्रार्थना

धर्मगुरू ः वंधू आणि भगिनी म्हणून ख्रिस्ताठायी आपण एकत्र जमलो आहोत. प्रभूने आपल्यावर केलेल्या अनेक उपकारांची आपण आठवण करू या. प्रार्थना करण्यास परमेश्वर आपल्याला स्फूर्ती देतो.आमच्या प्रार्थना स्वीकारण्यास आपण त्याला विनंती करू या.

प्रतिसाद ः **प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. आपले पोप फ्रान्सिस, विशप थॉमस, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी न्यायप्रिय व सत्यवचनी प्रभूकडून कृपा व चांगले आरोग्य लाभावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. आजच्या शुभवर्तमानातील भूतव्याधीपासून बरा झालेला माणूस प्रभू येशूचा गौरव करीत सर्वत्र फिरतो. बाप्तिस्मा स्वीकारलेल्या प्रत्येक ख्रिस्ती माणसाने प्रभूची ओळख इतरांना करून द्यावी व सुवार्ता प्रसाराच्या कामात सहभाग घ्यावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. आज ख्रिस्तसभा संत ब्लेझचा स्मृतीदिन साजरा करीत असताना त्याच्या मध्यस्थीद्वारे घशाच्या सर्व विकारापासून दूर राहण्यास प्रभूचा आरोग्यदायी स्पर्श आपणास व्हावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. संत गोन्सालो गार्सियाने आपले तारूण्य ख्रिस्ताची सुवार्ता जपानी लोकात घोषित करण्यात घालविले. युवक युवतींनी आपल्या तारूण्याचा वापर चांगल्या कामासाठी व ख्रिस्तसभेच्या सेवेसाठी करावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. ज्या कुटुंबात गैरसमजूतीमुळे दूही निर्माण झालेली आहे अशा सर्व कुटुंबांना ईश्वराचे विशेष मार्गदर्शन लाभावे, त्यांचे संबंध पुन्हा जुळून यावेत व त्याद्वारे धर्मग्रामात नेहमी निकोप वातावरण असावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडावेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक व कौटुंबिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

धर्मगुरू ः हे स्वर्गीय पित्या, संत गोन्सालोच्या मध्यस्थीने तुझ्या ख्रिस्तसभेच्या प्रार्थना ऐक. आमच्या श्रद्धेमधील उणिवा तुझ्या प्रेमाने भरून काढ व आमच्या मागण्या मान्य कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.



## धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

### नोव्हेनाचा सहावा दिवस – मंगळवार ०४ फेब्रुवारी २०२५

**पहिले वाचन** ः १ करिंथ ९ः १९—२७ **शुभवर्तमान** ः योहान १२ ः २० — ३२

### विश्वासू लोकांच्या प्रार्थना

धर्मगुरू ः माझ्या बंधुभगिनींनो, आमच्या तारणाचे रहस्य साजरे करण्यासाठी ख्रिस्ताठायी आम्ही येथे एकत्र जमलो आहोत. जीवन आणि आशीर्वादाचा हा झरा अखिल जगाला खुला करण्यासाठी आपण आपल्या परमेश्वरपित्याकडे याचना करू या.

प्रतिसाद ः **प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. आपले पोप फान्सिस, बिशप थॉमस, धर्मगरू व व्रतस्थ ह्यांना भाविकांचा विश्वास वाढविण्यास पवित्र आत्म्याचे कृपादान व चांगले आरोग्य लाभावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. आज ख्रिस्तसभा संत जॉन डिब्रिटो या संताचा स्मृती दिन साजरा करीत आहेत. त्यांने देव शब्दाचे काटेकोरपणे पालन केले, त्याच्या ओठावर येशूचे नाव होते. आपल्याही त्याच्या मध्यस्थीने देव शब्दाचे महत्व पटावे व प्रभू शब्दाचे प्रेरक बनता यावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. सर्व गरजवंतासाठी, विविध आजार, असाध्य रोग, दुर्बलता, अपंगत्व, मानसिक समस्या ह्यांनी त्रस्त असलेल्यांसाठी आपल्याला नेहमी प्रभूकडे विनवणी करता यावी तसेच त्यांची सेवा करून त्यांना नैतिक आधार देण्यास आपल्याला प्रेरणा मिळावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. लहान बालकांच्या बाप्तिस्मा साक्रामेंताची तयारी करून घेण्यासाठी घरोघरी जाणा-या आपल्या बाप्तिस्मा प्रसेवकांवर प्रभूचा वरदहस्त असावा, स्वतःला धर्मशास्त्रात पारंगत करून बालकांचे आईवडील व धर्म आई बाप ह्यांची योग्य ती तयारी त्यांना करता यावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. आपल्या धर्मग्रामातील जे लोक परगावात व परदेशात आहेत, जे नोकरी व चांगल्या व्यवसायाच्या शोधात आहेत, जे दररोज प्रवास करीत असतात अशा सर्वांवर परमेश्वराचा विशेष आशीर्वाद नेहमी राहावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडावेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक व कौटुंबिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

धर्मगुरू ः हे सर्वसमर्थ पित्या, संत गोन्सालोच्या मध्यस्थिने तुझ्या लोकांच्या प्रार्थना ऐक. तुझ्या प्रेरणेमुळे श्रद्धेने आम्ही तुझ्याकडे प्रार्थना करतो त्यांचा तू स्वीकार कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.



# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## नोव्हेनाचा सातवा दिवस – बुधवार ०५ फेब्रुवारी २०२५

**पहिले वाचन** ः इब्री १२ ः ४-७, ११-१५ **शुभवर्तमान** ः मार्क ६ः १ – ६

## विश्वासू लोकांच्या प्रार्थना

धर्मगुरू ः वंधू आणि भगिनी म्हणून ख्रिस्ताठायी आपण एकत्र जमलो आहोत. प्रभूने आपल्यावर केलेल्या अनेक उपकारांची आपण आठवण करू या. प्रार्थना करण्यास परमेश्वर आपल्याला स्फूर्ती देतो. आमच्या प्रार्थना स्वीकारण्यास आपण त्याला विनंती करू या.

प्रतिसाद ः **प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. आपले पोप फान्सिस, बिशप थॉमस, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना ख्रिस्तसभेची धुरा अखंडपणे वाहण्यास प्रभूकडून प्रेरणा व शक्ती मिळावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. संदेष्टयांचा स्वःगृही सन्मान होत नसतो. आपले सर्व याजक व धार्मिक अधिकारी आपल्यामधलेच असले तरी त्यांना प्रभूने निवडले आहे ह्याचे भान ठेवून त्यांचा आपल्याला योग्य तो मान सन्मान करता यावा तसेच त्यांना सहकार्य करण्यास आपण नेहमी तत्पर असावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. संत गोन्सालोचा जीवन प्रवास हा प्रभूसाठी व प्रभूकडे जाणारी एक तीर्थयात्रा होती. त्याच्या मध्यस्थीने आपल्याला आध्यात्मिक जीवन जगण्यास प्रेरणा मिळावी तसेच आपले जीवन नेहमी प्रभू कृपेने भरलेले असावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. वर्षभर दररोजची उपासना भक्तीमय रीतीने साजरी करण्यासाठी मदत करणा-या आपल्या उपासना समितीच्या सर्व सभासदांवर तसेच मिस्सावर वाचन करणा-यांवर प्रभूचा वरदहस्त असावा व उपासना अधिक अर्थपूर्ण करण्यासाठी त्यांना भरीव योगदान देता यावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. आपल्या धर्मग्रामातील जे भाविक देवाघरी गेलेले आहेत, विशेषकरून चर्चला भरीव मदत करणारे, त्यांना त्यांच्या सर्व अपराधांची क्षमा होऊन स्वर्गीय सुख मिळावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडावेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक व कौटुंबिक हेतूंसाठी हेतूसाठी प्रार्थना करू या.

धर्मगुरू ः हे स्वर्गीय पित्या, संत गोन्सालोच्या मध्यस्थीने तुझ्या ख्रिस्तसभेच्या प्रार्थना ऐक. आमच्या श्रद्धेमधील उणिवा तुझ्या प्रेमाने भरून काढ व आमच्या मागण्या मान्य कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.



## धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

### नोव्हेनाचा आठवा दिवस – गुरूवार ०६ फेब्रुवारी २०२५

**पहिले वाचन** ः इब्री १२ ः १८-१९,२१-२४ **शुभवर्तमान** ः मार्क ६ ः ७– १३

## विश्वासू लोकांच्या प्रार्थना

**धर्मगुरू** ः माझ्या बंधुभगिनींनो, आमच्या तारणाचे रहस्य साजरे करण्यासाठी ख्रिस्ताठायी आम्ही येथे एकत्र जमलो आहोत. जीवन आणि आशीर्वादाचा हा झरा अखिल जगाला खुला करण्यासाठी आपण आपल्या परमेश्वरपित्याकडे याचना करू या.

**प्रतिसाद** ः **प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. आपले पोप फान्सिस, बिशप थॉमस, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना प्रार्थनेचे महत्व भाविकांना पटवून देण्यासाठी पवित्र आत्म्याकडून सामर्थ्य मिळावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. प्रभू येशूने आपल्या शिष्यांना पाळकीय कामगीरीवर पाठवत असताना त्यांनी बरोबर काहीही घेऊ नये असे सांगितले. मिशनमध्ये कार्यरत असलेल्या सर्वांना कसल्याही वस्तूंची उणीव भासू नये तसेच तेथे येणा-या संकटांना धिराने तोंड देण्यास त्यांना सामर्थ्य लाभावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. आजच्या आधुनिक जगात वाढत असलेली सामाजिक व आर्थिक विषमता कमी करण्याच्या कार्यात आपल्याला सक्रिय सहभाग घेता यावा व त्यासाठी आपल्याला पवित्र आत्म्याकडून शक्ती व सामर्थ्य मिळावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. आपल्या सुमधूर गायनाने उपासना अधिकाधिक भक्तीमय व श्रवणीय करण्या-या आपल्या गायन मंडळाच्या सर्व सभासदांना प्रभूने आशीर्वादित करावे व त्यांनी आपल्या गायनाद्वारे उपासना विधी अधिक अर्थपूर्ण करण्यास सहाय्य करावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. भारताचा पहिला संत गोन्सालो ह्याच्या मध्यस्थीने आपल्या कुटुंबात नेहमी शांती नांदावी, सर्वांना सन्मानाची व समानतेची वागणूक मिळावी, आजारी व वयोवृद्धांची योग्य ती काळजी घेतली जावी तसेच प्रभू शब्दाचे नियमितपणे वाचन व्हावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडावेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक व कौटुंबिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

**धर्मगुरू** ः हे सर्वसमर्थ पित्या, संत गोन्सालोच्या मध्यस्थिने तुझ्या लोकांच्या प्रार्थना ऐक. तुझ्या प्रेरणेमुळे श्रद्धेने आम्ही तुझ्याकडे प्रार्थना करतो त्यांचा तू स्वीकार कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.



## धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

### नोव्हेनाचा नववा दिवस – शुक्रवार ०७ फेब्रुवारी २०२५

**पहिले वाचन** ः २ करिंथ ६ ः ४–१० **शुभवर्तमान** ः योहान १२ ः २४ – २६

### विश्वासू लोकांच्या प्रार्थना

धर्मगुरू ः बंधू आणि भगिनी म्हणून ख्रिस्ताठायी आपण एकत्र जमलो आहोत. प्रभूने आपल्यावर केलेल्या अनेक उपकारांची आपण आठवण करू या. प्रार्थना करण्यास परमेश्वर आपल्याला स्फूर्ती देतो. आमच्या प्रार्थना स्वीकारण्यास आपण त्याला विनंती करू या.

प्रतिसाद ः **प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. आपले पोप फ्रान्सिस, बिशप थॉमस, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना प्रभूच्या राज्याचा प्रसार करण्यास पवित्र आत्म्याचे कृपादान व चांगले आरोग्य लाभावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. गव्हाचा दाणा जमिनीत पडून मेला तर तो पुष्कळ फळ देतो. दैनंदिन जीवन जगत असताना आपल्या समोर येणा-या सर्व अडीअडचणी व समस्यांना धैर्याने तोंड देऊन तसेच इतरांना त्यांच्या गरजेत सर्वतोपरी साहाय्य करून आपल्याला चांगले प्रतिफळ मिळविता यावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. संत गोन्सालोच्या स्फूर्तीदिपक श्रद्धेद्वारे आपली प्रभूवरील श्रद्धा बळकट व्हावी व त्याच्या मध्यस्थीने आपल्या धर्मग्रामातील सर्वांमध्ये सतत परस्पर सहकार्याचे व प्रेमाचे नातेसंबंध असावेत, सर्वांना चांगले आरोग्य लाभून आनंदी जीवन जगता यावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. सर्व स्त्रियांना विशेष करून ज्या स्त्रियांचे मानसिक व शारीरिक शोषण केले जाते, अशांना परमेश्वराने त्याच्या विशेष कृपेने संपन्न करावे, त्यांना योग्य न्याय मिळावा व चांगल्या आरोग्याची देणगी लाभावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. सेमेनरी व कॉन्व्हेंटमध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या तरूण-तरूणींना आपला अभ्यास व आपले अध्यात्म यांमध्ये प्रगती करण्यासाठी पवित्र आत्म्याचे मार्गदर्शन व सहाय्य लाभावे तसेच येशूच्या मळयात काम करण्यासाठी अनेक तरूण-तरूणींनी पुढे यावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडावेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक व कौटुंबिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

धर्मगुरू ः हे स्वर्गीय पित्या, संत गोन्सालोच्या मध्यस्थीने तुझ्या ख्रिस्तसभेच्या प्रार्थना ऐक. आमच्या श्रद्धेमधील उणिवा तुझ्या प्रेमाने भरून काढ व आमच्या मागण्या मान्य कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.



# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## सामान्य काळातील पाचवा रविवार – ०९ फेब्रुवारी २०२५

## संत गोन्सालो गार्सिया सण

**पहिले वाचन** ः यशया ६ ः १–८ **दुसरे वाचन** ःे१ करिंथ १५ः १ – ११

**शुभवर्तमान** ः लूक ५ः १– ११

## विश्वासू लोकांच्या प्रार्थना

धर्मगुरू ः माझ्या बंधुभगिनींनो, आमच्या तारणाचे रहस्य साजरे करण्यासाठी ख्रिस्ताठायी आम्ही येथे एकत्र जमलो आहोत. जीवन आणि आशीर्वादाचा हा झरा अखिल जगाला खुला करण्यासाठी आपण आपल्या परमेश्वरपित्याकडे याचना करू या.

प्रतिसाद ः **प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. आपले पोप फ्रान्सिस, बिशप थॉमस, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना ख्रिस्ताच्या प्रकाशात चालण्यासाठी परमेश्वराची कृपा व चांगल्या आरोग्याची देणगी लाभावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. आपल्या राजकीय नेत्यांनी व अधिका-यांनी त्यांना मिळालेल्या अधिकाराचा वापर देशाच्या विकासासाठी करत असताना सामान्य माणसाच्या मूलभूत व वैद्यकीय गरजांकडे विशेष लक्ष द्यावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. संत गोन्सालो गार्सिया ह्यांचं जन्मस्थान वसई परंतु कार्यस्थान जपानमधील नागासकी. क्रुसावर रक्त सांडून जीवन जगणारा हा श्रद्धावंत वसईकर. त्याचा आदर्श आपण सर्वांनी जीवनात स्वीकारावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. संत गोन्सालो गार्सियाच्या मध्यस्थीने आपल्या धर्मग्रामातील सर्व चर्च सलंग्न संघटनेच्या सभासदांवर प्रभूचा भरपूर आशीर्वाद असावा व चर्चकार्यात त्यांचा नेहमी सक्रिय सहभाग असावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. थोडावेळ शांत राहून खालील गरजांसाठी प्रार्थना करू या ः

- आजारी व वयोवृद्ध लोकांसाठी
- आपल्या धर्मग्रामात कार्य करून गेलेल्या सर्व मृत धर्मगुरूंसाठी
- बाळाच्या अपेक्षेत असलेल्या दाम्पत्यांसाठी
- चर्चसाठी मदत करणा-या सर्व मृत भाविकांसाठी
- आपल्या वैयक्तिक व कौटुंबिक हेतूंसाठी

धर्मगुरू ः हे सर्वसमर्थ पित्या, संत गोन्सालोच्या मध्यस्थिने तुझ्या लोकांच्या प्रार्थना ऐक. तुझ्या प्रेरणेमुळे श्रद्धेने आम्ही तुझ्याकडे प्रार्थना करतो त्यांचा तू स्वीकार कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.